नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/05/2020 (सोमवार)
(सायंकाळ)

## खूनाच्या प्रयत्नातील आरोपी 36 तासात अटक कळमेश्वर पोलीसांची कारवाई

दिनांक 24/05/2020 पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत दिनांक 19/05/2020 रोजी रात्री 09.00 वा. सुमारास आशिष पेट्रोल पंप जवळील बंडु धाब्याजवळ, गोंडखैरी, ता.कळमेश्वर, जि.नागपूर येथे असलेल्या कंपनीतील चालक म्हणुन काम करणारा इसम नामे– शहबाज मुस्ताक शेख हा ड्युटी वर हजर होण्याकरीता आपल्या मित्रासह गेला होता. त्याठिकाणी गेल्यानंतर काही अज्ञात इसमांनी अज्ञात कारणावरुन काठी व रॉड ने शहबाज मुस्ताक शेख यास त्याच्या तोंडावर, डोक्यावर मारहाण करुन गंभीर दुखापत करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच जखमी इसमाच्या दुचाकी वाहनाची तोडफोड करुन नुकसान केले असे जखमी इसमाच्या लहान भावाने दिलेल्या तक्रारीवरुन अप.क्र. 378/2020, कलम 307,427,34 भारतीय दंड संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर यातील अज्ञात आरोपीतांचा शोध होण्याकरीता अतिशय मेहनतीने पुरावा गोळा करुन यामध्ये 5 आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयात कलम 143,144,147,148,149 भादवि सहकलम 135 महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये कलमवाढ करुन आरोपीचा शोध सुरु केला. नमुद गुन्हयात निष्पन्न झालेले आरोपीतांपैकी मुख्य आरोपी असलेले योगेश सेवकराम माकोडे, अक्षय सेवकराम माकोडे, प्रफुल उर्फ पोपट गजानन चौधरी यांनी जखमी इसमास जुन्या वादाच्या कारणावरुन मारहाण केली. ते पोलीसांच्या अटक पासुन वाचण्याकरीता दिवसभरात वेगवेगळया ठिकाणी पलायन करीत होते. परंतु कळमेश्वर पोलीसांनी आपल्या गोपनीय तंत्राचा वापर करुन आरोपी लपुन बसलेल्या ठिकाणी सापळा रचुन अवघ्या 36 तासात योगेश सेवकराम माकोडे, अक्षय सेवकराम माकोडे, प्रफुल उर्फ पोपट गजानन चौधरी यांना ताब्यात घेवुन अटक केली. नमुद गुन्हयात आरोपी हे अज्ञात असुन सुध्दा कळमेश्वर पोलीसांनी आपल्या तपास तंत्राच्या आधारे आरोपी निष्पन्न करुन आरोपीतास बेडया ठोकल्या.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला सर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनीका राऊत मॅडम, उपविभागीय अधिकारी श्री. अशोक सरंबळकर, ठाणेदार तथा पोलीस निरीक्षक श्री. मारुती मुळुक यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार यांच्या नेतृत्वातील एएसआय दिलीप सपाटे, पोहवा मन्नान नोरंगाबादे, प्रकाष उईके, नापोशि भुवन शहाणे, रवि मेश्राम या पथकानी केली.

## कळमेश्वर पोलीसांची सांवगी (उमा) येथील कोंबड बाजारावर धाड

कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा सांवगी (उमा) शिवारातील गजानन नारायण अतकरी यांच्या पडीक शेतातील वडाच्या झाडाखाली काही जुगारी इसम हे लोकांची गर्दीत कोंबडयाची झुंज लडवुन त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळत आहे अशी विश्वनीय खबरीवरुन ठाणेदार तथा पोलीस निरीक्षक श्री. मारुती मुळुक यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, एएसआय दिलीप सपाटे, पोहवा प्रकाश उईके, चंद्रशेखर सावध, नापोशि भुवन शहाणे, अतुल खोडनकर, पो.षि. संजु नट, विशाल बडदे यांनी पंचासह कोबंडयाची झुंज भरल्याठिकणी धाड टाकली असता आरोपी नामे 1) दिनेश पुरुशोत्तम लाडके, 2) रमेश मधुकर बावणे, 3) शनि कुमार 4) करण रमेश बावणे, 5) शुभम प्रल्हाद भिवनकर यांना रंगेहाथ जुगार खेळतांना पकडले. तसेच पळुन गेलेले आरोपींच्या एकुण 3 मोटार सायकल ताब्यात घेण्यात आल्या. रेड मध्ये 3 लढाऊ जखमी कोंबडया, 2 लोखंडी काती, व नगदी, 7 मोटार सायकल असा एकुण 1,96,000/—रुपयाचा माल जप्त केला व एकुण 8 आरोपीतांविरुध्द कलम 12 महाराष्ट्र जुगार कायदयान्वये कारवाई करण्यात आली.

## पाण्यात बुडुन मृत्यु

पो.स्टे. खापा :— अंतर्गत 10 कि. मी. कोच्छी ड्रम्प येथे दिनांक 23/05/2020 चे 17.00 वा. दरम्यान शालीक आत्माराम बागडे, वय 40 वर्ष, रा. मंगसा हा गावातील मुलासह पोहण्यास गेला असता पाण्यात बुडुन मरण पावल्याने त्याचे प्रेत पाण्याच्या वर तरंगतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— आशिष शेखर मेश्राम, वय 26 वर्ष, रा.मंगसा ता सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गंगाधर ठाकरे 7249471860 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर